बाब क्र. १(३)

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ८०व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २७ नोव्हेंबर, १९९५ [सोमवार]

वेळ : सकाळी ९-०० वाजता

सभास्थान : सहयाद्री अतिथी गृह, बी. जी. खेर मार्ग, मलबार हिल, मुंबई-४०० ००६.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर जोशी<br>मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र माने<br>नगर विकास राज्यमंत्री | - | सदस्य |
| श्री. सुभाष मयेकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. रा. रा. सिंह<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. चंद्रकांत पडवळ<br>विधानसभासदस्य | - | सदस्य |
| श्री. राज पुरोहीत<br>विधानसभा सदस्य | - | सदस्य |
| श्री. वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | - | सदस्य |
| श्री. ज. दा. जाधव<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |

श्री० डी० टी० जोसेफ — सदस्य
शासनाचे सचिव
[नगर रचना व पाणीपुरवठा
आणि जलनि:स्सारण]
नगर विकास विभाग

श्री० अजित वर्टी — सदस्य
शासनाचे सचिव,
गृहनिर्माण व विशेष
सहाय्य विभाग

श्री० देवव्रत मेहता — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

प्रारंभी अध्यक्षांनी, श्री० चंद्रकांत पडवळ, विधानसभा सदस्य व श्री० राज पुरोहित, विधानसभा सदस्य यांचे प्राधिकरणाचे नवे सदस्य म्हणून स्वागत केले.

त्यानंतर, अध्यक्षांनी प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री० अमरनाथ पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यानंतर प्राधिकरणाने, दिवंगत श्री० पाटील यांच्या निधनाबद्दल एक ठराव एक मिनिट स्तब्ध उभे राहून मंजूर केला [जोडपत्र पहावे].

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

<u>बाब क्र० १</u> : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमध्ये बहुमजली वाहनतळ आणि वाणिज्यिक भूखंड विकसित करणे - मे० युगधर्म इन्व्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रा० लि० यांचे बरोबरचा भूखंड वाटप करार समाप्त करण्याच्या युगधर्म यांच्या सूचनेबाबत. -

१.१ ही बाब बैठकीसमोर ठेवताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मेसर्स युगधर्म इन्व्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रा० लि० [युगधर्म] यांचा सर्वोच्च पात्र देकार स्वीकृत करून त्यांना "जी" ब्लॉकमधील बहुमजली वाहनतळ आणि वाणिज्यिक भूखंड नेमून देण्यास प्राधिकरणाने आपल्या दिनांक २२ मे, १९९५ रोजीच्या ठराव क्र० ६२९ नुसार मान्यता दिल्यावर त्यांना तसे कळविण्यात आले व त्यानंतर

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम, १९७७ प्रमाणे त्यांनी देकाराची अर्धी रक्कम म्हणजेच रु. ७६,५०,०४,०००/- [रुपये शहात्तर कोटी पन्नास लाख चार हजार फक्त] दिनांक ८ जून, १९९५ रोजी भरले व उर्वरीत अर्धी रक्कम भरण्यासाठी विनियमातील तरतूदीप्रमाणे ६ महिन्यांची मुदतवाढ मागितली व ती त्यांना मान्य करण्यात आली. वाढीव मुदत दिनांक २३ नोव्हेंबर, १९९५ रोजी संपली.

१.२ मेसर्स युगधर्म यांनी त्यांच्या दिनांक ४ नोव्हेंबर, १९९५ च्या पत्राद्वारे वर उल्लेख केल्याप्रमाणे प्राधिकरण व त्यांचेमधील झालेला करार परस्पर संमतीने रद्द करावा असे प्रस्ताविले होते. विनियमामध्ये वाढीव मुदतीत रक्कम न भरल्यास करार रद्द करावा किंवा करु नये याबाबतीत प्राधिकरणाला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे पण तसे करीत असताना कोणत्या अटी व शर्ती लागू कराव्यात याबद्दलचा उल्लेख मात्र विनियमामध्ये नाही. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी, प्राधिकरण ज्या अटी व शर्ती ठरविल त्याप्रमाणे करार समाप्त करण्याचे अधिकार प्राधिकरणाला आहेत असे मत याबाबतीत दिले होते. वरील सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्राधिकरणाने याबाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा अशी महानगर आयुक्तांनी बैठकीस विनंती केली.

१.३ या बाबतीत काही चर्चा झाल्यानंतर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, उक्त विनियम हे १९७७ सालामध्ये प्राधिकरणाने तयार केलेले आहेत व त्यामध्ये अशा त-हेने करार रद्द करावयाचे प्रसंग आल्यास; किंवा अनेक भूखंडासाठी निविदा मागविल्यावर व ज्यावेळी एकच भूखंड एका निविदाकारास दिला जाईल अशी अट असेल व जिथे एक निविदाकार अनेक भूखंडांसाठी सर्वोच्च असेल त्यावेळी उरलेल्या भूखंडाचे वाटप कसे करावे; किंवा दुस-या हप्त्याची रक्कम भरण्यासाठी ६ महिन्यांपेक्षा जास्त मुदत मागितली असल्यास काय करावे, इ. अनेक बाबतीत तरतूदी नाहीत. त्यामुळे काही प्रकरणे न्यायालयात जातात. अशा प्रकारच्या जरुर असलेल्या अनेक तरतूदी करण्यासाठी उक्त विनियमांमध्ये लवकरात लवकर दुरुस्ती करणे

 457

जरुरीचे आहे व याबाबतीतील प्रस्ताव कार्यकारी समितीमार्फत प्राधिकरणास लवकरच सादर करण्यात येईल असे महानगर आयुक्तांनी त्यानंतर सांगितले.

१.४ महानगर आयुक्तांच्या सुचनेशी सहमत होऊन प्राधिकरणाने मेसर्स युगधर्म यांच्या बरोबर केलेला करार समाप्त करण्यास व तसे करीत असताना मेसर्स युगधर्म यांनी भरलेल्या निवीदेच्या इसारा रकमेएवढी रक्कम म्हणजेच रु. ५०,००,०००/- [रुपये पन्नास लाख फक्त] वजा करता त्यांना भरलेली बाकीची रक्कम परत करण्यास व त्यांनी भरलेल्या रकमेवर काहीही व्याज न देण्याचे ठरविले. तसेच उपरोल्लेखित भूखंडाचे वितरण करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असेही प्राधिकरणाने ठरविले.

१.५ त्यानंतर, प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र ६५६ :

" असा ठराव करण्यात येतो की, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण अधिनियम, १९७७ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण मेसर्स युगधर्म इनव्हेस्टमेंट अँड ट्रेडिंग कंपनी प्रा. लि. यांचे बरोबर वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील बहुमजली वाहनतळ आणि वाणिज्यिक भूखंड यांबाबतीत झालेला करार समाप्त करण्यास तसेच त्यांनी भरलेल्या निविदेच्या इसारा रकमेएवढी रक्कम म्हणजेच रु. ५०,००,०००/- [रुपये पन्नास लाख फक्त] वजा करता त्यांनी भरलेली बाकीची रक्कम म्हणजेच रु.७६,००,०४,०००/-[रुपये शहात्तर कोटी चार हजार फक्त] त्यांना परत करण्यास व त्यांनी भरलेल्या रकमेवर काहीही व्याज न देण्याचे याद्वारे ठरवित आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, उपरोल्लेखित भूखंडाचे वाटप करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त

यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.२ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमध्ये वित्तीय संस्थांना वाणिज्यिक भूखंडाचे वाटप करणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करून पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६५७ :

" असा ठराव करण्यात येतो की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे खालील संस्थांना अधिमूल्याची राहीलेली रक्कम भरण्यास आणखी ६ महिन्यांची मुदत वाढ देण्यास व वाढीव काळात त्यांचेकडून भरावयाच्या रकमेवर १८% दराने व्याज वसूल करण्यास मान्यता देत आहे:

१. वैश्य बँक लि.

२. ग्लोबल ट्रस्ट बँक लि.

३. वाईझमॅन लि.

४. रिलायन्स कॅपिटल लि. [पूर्वीची रिलायन्स कॅपिटल ॲन्ड फायनान्स ट्रस्ट लि.]

"आणखी असाही ठराव करण्यात येतो की, संबंधित संस्थांना तदनुसार कळविण्यास आणि याबाबतीत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

---

जोडपत्र

451

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ८० वी बैठक

दिनांक : २७ नोव्हेंबर, १९९५

: ठराव :

"श्री. अमरनाथ वामन पाटील, माजी नगरसेवक यांचे दिनांक ३१ ऑक्टोबर, १९९५ रोजी दु:खद निधन झाले. दिवंगत पाटील हे दिनांक १४.८.१९७८ ते दिनांक १९.५.१९८३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. तसेच दिनांक २८.५.१९८५ ते दिनांक १०.४.१९८६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष या नात्याने सदस्य होते. या काळात श्री. पाटील यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण, त्यांच्या दु:खद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री. पाटील यांचे कुटुंबियांकडे पाठवुन त्यांच्या दु:खात हे प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

------------